# शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नागपूर यांचे कार्यालय

सिव्हील लाईन, 210, पहिला माळा, जि.प. जुनी इमारत, नागपूर-01

☎/फॅक्स : 0712-2549149 ईमेल : ssanagpur1@yahoo.co.in


जा.क्र.जिपना/शिवि/खा.प्राथ./खाते-मा/ 5753 /2026 दिनांक : 02/04/2026

## सुधारित आदेश

प्रति

**अध्यक्ष/सचिव**
**सर शांतीलाल बडजाते चॅरीटेबल ट्रस्ट,**
**शांतीनिकेतन, धरमपेठ, नागपूर**

**विषय :-** प्रथम खाते मान्यता देण्याबाबत.

**संदर्भ:-** 1.महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) नियम,२०२०. दि. ०५.१०.२०२०

2. मा.अवर सचिव, म.शासन यांचे पत्र क्र. No Noc-२००६/३२९/२००६) SE-१ दि ३०.०६.२००६

3. मा.अवर सचिव, म.शासन यांचे पत्र क्र. No Noc-२००६/३२९/२००६) SE-१ दि ०६.११.२००७

4. या कार्यालयाचे पत्र क्र.जिपना/शिक्षण/प्राथ/मान्यता/का.क्र.२५/७७०९/२१ दि.२९.०९.२०२१

5. मुख्याध्यापक, द जैन इंटरनॅशनल स्कूल नागपूर यांचे पत्र दि.३१.०३.२०२६

उपरोक्त संदर्भ क्र. २ व ३ अन्वये मा.अवर सचिव, महाराष्ट्र शासन यांचेकडून सदर शाळेला (CBSE) मंडळ बाबत नाहरकत प्रमाणपत्र प्राप्त आहे. संदर्भ क्र. ४ अन्वये सर शांतीलाल बडजाते चॅरीटेबल ट्रस्ट शांतीनिकेतन, धरमपेठ, नागपूर व्दारा संचालित दी जैन इंटरनॅशनल स्कूल नागपूर ही शाळेला या कार्यालया कडुन प्रथम खाते मान्यता पत्र ३ वर्षा साठी देण्यात आले होते. संदर्भ क्र. ५ अन्वये मुख्याध्यापक द जैन इंटरनॅशनल स्कूल नागपूर यांनी प्रथम खाते मान्यता सुधारित पत्र मिळणेकरीता प्रस्ताव या कार्यालयास सादर केलेला आहे.

त्यानुसार खालील प्रमाणे **सुधारित प्रथम खाते** मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अ क्र | जिल्हा | अर्जदार संस्थेचे नांव व पत्ता | मान्यता मिळालेल्या शाळेचे नांव व पत्ता | माध्यम | नवीन शाळा/ दर्जावाढ | मंडळ संलग्न | शाळेचा प्रकार | मान्यता वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | नागपूर | सर शांतीलाल बडजाते चॅरीटेबल ट्रस्ट शांतीनिकेतन, धरमपेठ, नागपूर | द जैन इंटरनॅशनल स्कूल नागपूर संत आसारामबापू आश्रम मार्ग येरला काटोल रोड नागपूर | इंग्रजी | नवीन शाळा | सी.बी.एस.ई. | प्राथमिक (इयत्ता १ ली ते ८ वी) | २०२४-२५ |

### अटी व शर्ती

१) सदर शाळेने बालकांचा व मोफत सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ आणि महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम २०११ याद्वारे निर्धारित केलेल्या सर्व मानकांची, अटींची व शर्तींची आणि या अधिनियामान्वये शासनाने दिलेल्या निर्देशांची किंवा शासनाने, वेळोवेळी निर्दिष्ट केलेल्या मानकांची किंवा प्रमाणकांची किंवा अटींची आणि शर्तींची पूर्तता करणे आवश्यक आहे.

२) नोंदणीकृत संस्थेने किंवा न्यासाने किंवा कंपनीने, महाराष्ट्र स्वंय अर्थसहाय्यीत शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ याद्वारे निर्धारित केलेल्या सर्व मानकांचे, अटींचे व शर्तींचे आणि या अधिनियान्वये शासनाने दिलेल्या निर्देशाचे किंवा शासनाने वेळोवेळी निर्दिष्ट केलेल्या मानकांचे किंवा अटींचे आणि शर्तींचे पालन करणे अनिवार्य आहे.

३) सी.बी.एस.ई. किंवा आय. एस.सी.ई किंवा सी.ए.आय.ई. किंवा आय. बी. इत्यादी मंडळाच्या संलग्नतेसाठी इच्छुक शाळा, व्यवस्थापनांनी शासनाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशानुसार शासनाकडून ना-हरकत प्रमाणपत्र घेणे अनिवार्य आहे.

४) या अधिनियमाच्या तरतुदीअन्वये नवीन शाळेची स्थापना करण्यासाठी दिलेली परवानगी ती ज्या शैक्षणिक वर्षासाठी मंजुर केली आहे त्याच वर्षासाठी असेल.

५) शाळा व्यवस्थापनास अठरा महिन्याच्या आत शाळा सुरु करण्यास अपयशी ठरल्यास दिलेले मान्यता पत्र रद्द होईल.

६) शाळा व्यवस्थापनास शासनाने मंजुर केलेले शिक्षणाचे माध्यम, शाळेचे ठिकाण भविष्यात शासनाच्या परवानगी शिवाय बदलता येणार नाही.

७) शाळा व्यवस्थापनाने शासनाने मंजुरी दिलेल्या ठिकाणाव्यतीरिक्त अन्य ठिकाणी शाळा स्थापन केली असेल तर त्या शाळेची परवानगी रद्द होईल.

८) परवानगी दिलेल्या स्वयं अर्थसहाय्यीत शाळेमध्ये शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भरती शासनाच्या प्रचलित नियमांनुसार व विनियमांनुसार करण्यात यावी.

९) जिल्हा निहाय माहिती भरतेवेळी ज्या शाळेस परवानगी देण्यात आली आहे ती शाळा स्वतंत्र प्रवर्ग म्हणून स्वयं अर्थसहाय्यीत शाळा अशी माहिती भरतील व यु.डी.आय.एस.इ. क्रमांक मिळवितील. या संबधात राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक परिषद, मुंबई यांना नोडल अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे.

१०) सदर संस्थेने स्वयं अर्थसहाय्यीत परवानगी प्राप्त शाळा असा जाहिर फलक शाळेच्या बाहेर प्रवेशद्वाराजवळ लावणे आवश्यक राहिल.

११) या अधिनियमाच्या कोणत्याही किंवा त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतूदींचा भंग केल्याच्या किंवा अधिनियमान्वये दिलेली कोणत्याही निर्देशाचे किंवा शासनाने वेळोवेळी निर्दीष्ट केलेल्या मानकांचे किंवा प्रमाणकांचे अथवा अटिंचे व शर्तींचे अनुपालन करण्यास कसुर केल्याच्या कारणावरुन कोणत्याही वेळी राज्य शासन दिलेली मान्यता पत्र रद्द करु शकेल.

१२) सदर संस्थेने किंवा न्यासाने किंवा कंपनिने अधिनियमाच्या अनुसूची ग मध्ये विनिर्दिष्ट केलेली रक्कम व्यवस्थापन आणि संबंधित शिक्षणाधिकारी (माध्य.) यांच्या नावाने संयुक्तरित्या राष्ट्रीय बचत प्रमाणपत्र स्वरुपात किंवा कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेतील मुदत ठेविच्या स्वरुपात शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचेकडे तारण म्हणून ठेवणे आवश्यक राहिल.

तसेच शासनाचे सध्या अस्तित्वात असलेले प्रचलित नियम व शासन वेळोवेळी विहित करेल अशा नियमांची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.

(निलेश गुंड)
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद, नागपूर

**प्रतिलीपी** :-

१) मा. अवर सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.
२) मा. शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग, नागपूर यांना माहितीस्तव सविनय सादर.
३) मुख्याध्यापक, द जैन इंटरनॅशनल स्कूल नागपूर संत आसारामबापू आश्रम मार्ग येरला काटोल रोड नागपूर यांना माहितीस.

The Jain International School ★ Nagpur
C.B.S.E. Affiliation No. 1130140

Principal
The Jain International School, Nagpur
CBSE Affiliation No. 1130149

Manager
The Jain International School, Nagpur
CBSE Affiliation No. 1130149